# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## श्री.नरपेश बाबुलाल उठेवाल, हमाल यांना जाहीर नोटीस

श्री.नरपेश बाबुलाल उठेवाल, हमाल, स्थावर विभाग यांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आपण दिनांक ०१ जानेवारी,२०१६ पासून विनापरवानगी दीर्घकाळ गैरहजर आहात. आपल्या गैरहजेरीबाबत संदर्भ क्र.एएन/२७४४ दिनांक १३ मे,२०१६ अन्वये आपण त्वरीत स्थावर विभागामध्ये रुजू होऊन सदर रजेच्या आवेदन पत्रासोबत रुजू अहवाल मा.विभागप्रमुखांमार्फत त्यांच्या स्पष्ट अभिप्राय/शिफारशीसह प्रशासन शिक्षकेतर कक्षास सादर करावा असे आपणास कळविण्यात आले होते.

आपण दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या अर्जान्वये हमाल या पदावर कामावर हजर करुन घेण्याबाबत विनंती केलेली होती. आपण केलेल्या विनंती अर्जानुसार आपणास संदर्भ क्र.एएन/४४८१, दिनांक ०६ डिसेंबर, २०१७ च्या पत्रान्वये विनापरवानगी दिर्घकाळ गैरहजर राहणेबाबतची आपली वर्तणूक कार्यालयीन शिस्तीस धरुन नसल्याने, तसेच आपले सदरचे वर्तन गैर व कार्यालयीन शिस्तभंग करणारे असून महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९, नियम क्र.३(१)(एक) (दोन) व (तीन) मधील तरतुदीनुसार गैरवर्तन ठरत असल्यामुळे विभागप्रमुखांची पूर्व परवानगी न घेता रजेवर राहिल्यास आपणास कामावर रुजू करुन घेतले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच विभागप्रमुखांच्या आदेशाचे व कार्यालयीन शिस्तीचे तंतोतंत पालन करावे, अन्यथा महाराष्ट्र नागरी सेवा नियमतील तरतूदीनुसार आपणावर प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल, याची कटाक्षाने नोंद घ्यावी असे आपणास सदर पत्रान्वये कळविण्यात आले होते.

आपण दिनांक ०१ जानेवारी,२०१६ पासून विनापरवानगी दीर्घकाळ गैरहजर आहात. आपणास त्याबद्दल वेळोवेळी ज्ञापने देऊन देखील आपण आजतागायत कामावर रुजू झालेला नाहीत. त्यामुळे संदर्भ क्र.एएन/४६५८ दिनांक ०१.१०.२०१५ च्या नियुक्ती आदेशातील अट क्र. १ व अट क्र.११ मधील तरीतुदीनुसार आपली हमाल या शासनमान्य पदाची सेवा संपुष्टात आणणेबाबत तरतूद आहे. त्युनसार आपणास दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजी कार्यालयीन वेळेनंतर हमाल या पदावरुन विद्यापीठ सेवेतून सेवामुक्त करण्यात आले आहे, याची नोंद घ्यावी.

जाहिरात क्र. : ११ — (डॉ.प्रफुल्ल पवार)

दिनांक : ३/६/२०२१ — कुलसचिव